’सहकार क्षेत्रातील नागरी सहकारी पतसंस्थांचा चिकित्सक अभ्यासःलातूर जिल्हा संदर्भात विशेष अध्ययन सन 2006–07 ते 2016–17’

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

पी.एचडी. (अर्थशास्त्र पदवी प्रबंधाच्या पुर्वचर्चेसाठी सारांश)

संशोधिका

हिंगले राजकन्या फुलचंद

संशोधक मार्गदर्शक

डॉ. आर.एम.चौधरी

सरस्वती संगीत कला महाविद्यालय, लातूर

सन 2018

-: सहकार क्षेत्रातील नागरी सहकारी पतसंस्थांचा चिकित्सक अभ्यास :-
लातूर जिल्हा संदर्भात विशेष अध्ययन.
(सन २००६-०७ ते २०१६-१७)

प्रस्तावना

भारत हा कृषीप्रधान देश आहे. सन २०११ च्या जनगणनेप्रमाणे भारतात ५,८०,७८१ खेडी असून सध्या भारताची लोकसंख्या १२१.०२ कोटी आहे. एकूण लोकसंख्येपैकी सुमारे ६७.०२ कोटी लोकसंख्या ग्रामीण भागात राहते. देशाचा विकास ग्रामीण भागाच्या विकासावर अवलंबून असतो. मानवाच्या सहजीवनातून सहकार ही संकल्पना उदयास आली असून सहकार ही संज्ञा फार जुनी आहे. मानवी उत्क्रांतीच्या अवस्थेपासून ही संज्ञा उदयास आली आहे. मनुष्य ही एक समाजप्रिय प्राणी आहे. त्यामुळे तो आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी समूहाने राहतो. अथवा समाजात सामूहिकपणे राहतो. सहकार आणि सहजीवन यांचा जवळचा संबंध आहे. सर्वानी मिळून एकत्रित काम करणे याला सहकारात अनन्यसाधारण महत्व असते. शिवाय सहकार ही एक स्वाभाविक प्रेरणा आहे. मनुष्याच्या एकत्रित कामे करण्याच्या कृतीला सहकार असे म्हणतात.

सहकार म्हणजे एकत्र किंवा बरोबर काम करणे होय. सहकारी संस्थांची आवश्यकता समाजातील सर्व थरातील लोकांना असते आणि विशेषत: समाजातील सर्व थरातील लोकांना असते आणि विशेषत : समाजातील दुर्बल घटकांसाठी त्याची आवश्यकता अधिक तीव्रतेने जाणवते. समान आर्थिक उद्दीष्ट असणा-या अनेक व्यक्ती एकत्र येऊन सहकारी संस्था स्थापन करुन आपल्या समान गरजा परस्परांच्या सहकार्याने सोडविण्याचा प्रयत्न करतात.

सहकारी चळवळ सुरु होण्यापूर्वी आर्थिक क्षेत्रामध्ये एकल व्यापारी, भागीदारी इ. खाजगी व्यवसाय संस्था प्रचलीत होते. औदयोगिक क्रांतीनंतर खाजगी व सार्वजनिक कंपन्या अस्तित्वात आल्या. व त्यांचा समावेश सरकारी क्षेत्रात होतो. या सर्व कंपन्या नफा मिळविण्याच्या मुख्य हेतूनेच कार्य करतात. अशा कंपन्या प्रकारांमध्ये भांडवल या घटकालाच प्राधान्य दिले जाते. आर्थिक क्षेत्रामध्ये खाजगी तसेच सरकारी संस्थाशिवाय आणखी एक संस्था प्रकार कार्य करीत असल्याचे दिसून येते. तो प्रकार म्हणजे सहकारी संस्था होय. सहकार म्हणजे समाजातील आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या व्यक्ती एकत्रित येऊन एकमेकांच्या मदतीने आपल्या विविध गरजा पूर्ण करण्यासाठी स्थापन केलेली संस्था होय.

भारतीय सहकार कायदा (१९१२)नुसार " सहकारी तत्वांना अनुसरुन आपल्या सभासदांचे आर्थिक हितसंबंध वृद्धींगत करण्याचे ज्या संस्थेचे उद्दीष्ट असते . तिला सहकारी संस्था " असे म्हणतात.

सहकारी पतसंस्था ही देखील इतर व्यावसायिक संस्था प्रकाराप्रमाणे व्यवसाय करणारी एक संस्था आहे. परंतु तिचा हेतू फक्त नफा मिळविणे हा नसून सेवा देणे व सभासदांचे हित जोपासणे हा असतो. ज्यामध्ये व्यक्ती या घटकाला प्राधान्य दिले जाते व नफयाला गौण स्थान दिले जाते.

भारतीय अर्थव्यवस्थेत शेती व शेती पूरक व्यवसायांना महत्वाचे स्थान आहे. शहरी भागाच्या सर्वागीण उन्नतीकरता शेती क्षेत्रातील गुंतवणूक व रोजगार, उत्पादनात वृध्दी करणे आवश्यक आहे. शेतीबरोबर शहरी उदयोगांना सहाय्य करण्याच्या दृष्टीकोनातून शहरी पातळीवरील नागरी सहकारी पतसंस्थांचे कार्यक्षेत्र विस्तृत करुन त्याचे शाखा स्थापन करणे.

महत्व

भारतात सहकारी चळवळीचा प्रारंभ हा सहकारी संस्था कायदा १९०४ च्या कायदयाने झाला. शेतीसाठी अल्प व मध्यम मुदत कर्जपुरवठा करण्यासाठी सहकारी पतसंस्थांची स्थापना होऊ लागली. समाजाच्या इतर गरजांचा विचार करुन इ.स.१९१२ मध्ये सहकारी संस्थाविषयक दुस-या संमत केलेल्या कायदयामध्ये बदल करुन इतर क्षेत्रातही सहकारी संस्था करण्यास अनुमती देण्यात आली. या सहकारी संस्थांचा देशाच्या आर्थिक विकासामध्ये महत्वाचा सहभाग आहे.

भारतात सहकारी चळवळीची सुरुवात होण्यापूर्वी शेतक-यांना भरमसाठ व्याज दराने कर्ज घ्यावे लागत असे. व ते शेतक-यांची फसवणूक करीत असत. सहकारांच्या क्षेत्रात सहकारी पतपुरवठा संस्थांची स्थापना झाल्यामुळे सावकारांची मक्तेदारी कमी होण्यास मदत झाली आहे.व शेतक-याना अल्प व मध्यम मुदतीचा कर्जपुरवठा मिळण्याची सोय झाली. तसेच या संस्थांचा लाभ आर्थिक दृष्टया दुर्बल घटकापर्यत पोहोचला की नाही. या क्षेत्रातील लोकांच्या जीवनावर या सहकारी संस्थांचा कितपत परिणाम झाला? या सहकारी क्षेत्रामार्फत राबविल्या जाणा-या विविध योजनांचा हे क्षेत्र लाभ घेते का ? कोणत्या उपाय योजना योजाव्यात इ. बाबी जाणून घेण्यासाठी सहकार क्षेत्रातील नागरी सहकारी पतसंस्थांचे शहरी व निम्न शहरी भागातील चिकित्सक अभ्यास हा विषय अभ्यासासाठी निवडला आहे.

व्याख्या :-

" समान आर्थिक उद्दीष्टे साध्य करण्यासाठी समान गरजा असणा-या व्यक्तींनी ऐच्छिकरित्या स्थापन केलेली संघटना म्हणजे सहकार होय."

व्ही.एल.मेहता .

अभ्यासाची उद्दीष्टे

प्रस्तुत संशोधनाची उद्दीष्टे पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात आली आहे.

१.नागरी सहकारी पतसंस्थांच्या रचना व व्यवस्थापनेचा आढावा घेणे.

२.सहकारी चळवळीच्या इतिहासाच्या प्रगतीचा आढावा घेणे.

३.लातूर जिल्हयातील नागरी सहकारी पतसंस्थांच्या आर्थिक प्रगतीचा आढावा घेणे.

४.लातूर जिल्हयातील नागरी सहकारी पतसंस्थांना भेडसावणा-या आर्थिक समस्यांचा अभ्यास करणे.

५.लातूर जिल्हयातील नागरी सहकारी पतसंस्थांच्या समस्यांवरील उपाययोजना सूचविणे.

अभ्यासाची गृहीतके :-

१. नागरी सहकारी पतसंस्थांच्या शहरी कर्जपुरवठयात वाढ झालेली आहे.

२.नागरी सहकारी पतसंस्थांची भूमिका शहरी व निमशहरी भागात प्रभावी आहे.

३. नागरी सहकारी पतसंस्थांच्या थकबाकीचे प्रमाण वाढत आहे.

अभ्यासाची मर्यादा :-

निमशहरी व शहरी भागातील नागरी सहकारी पतसंस्थांच्या कार्याची व्याप्ती खूप मोठी आहे. वेळ, पैसा, श्रमाच्या मर्यादेमुळे प्रस्तुत संशोधन लातूर जिल्हयातील नागरी सहकारी पतसंस्था सभासदांच्या आर्थिक व सामाजिक परिस्थिती या घटकांशी निगडीत असून संशोधन करण्यासाठी २००६-०७ ते २०१६-१७ हा कालावधी निवडला आहे. त्यामुळे हे संशोधन केवळ लातूर जिल्हयापुरतेच मर्यादीत आहे.

संशोधन पध्दती :-

प्रस्तुत संशोधन कार्यात विविध घटक महत्वाचे असतात. येथे सत्याचा शोध घेण्यासाठी वास्तविकता महत्वाची असते. याशिवाय संशोधन करणे शक्य नाही. कोणत्याही घटनेचे वास्तव व खरे स्वरुप मिळविण्यासाठी तथ्य आवश्यक असतात. संपूर्ण संशोधन हे तथ्यावर अवलंबून असते. त्यामुळे ही तथ्य शोधण्यासाठी प्राथमिक व दुय्यम साधन सामुग्रीचा वापर केलेला आहे.

अ) प्राथमिक स्त्रोत :-

लातूर जिल्हयात एकूण १० तालुके आहेत. या जिल्हयातील नागरी सहकारी पतसंस्थांचा अभ्यास करण्यासाठी यादृच्छिक नमुना निवड पध्दतीचा वापर केलेला आहे.लातूर जिल्हयामध्ये एकूण (६०) नागरी सहकारी पतसंस्था आहेत. यामुळे ५०% पतसंस्थांचा नमुना निवड पध्दतीनुसार निवड करण्यात येणार आहे. तसेच प्रस्तुत अध्ययनात सन २००६-०७ ते २०१६-१७ मध्ये लातूर जिल्हयातील निवडक ५०% संस्थांच्या एकूण सभासदांपैकी (५%) सभासदांची सभासदांकडून प्राथमिक माहिती मिळविण्यासाठी संस्थांचे चेअरमन, कार्यकारी संचालक, सभासद , सचिव , कर्मचारी वर्गाकडून प्रश्नावलीद्वारे तसेच मुलाखत, निरीक्षणाद्वारे माहिती गोळा करुन माहितीचे विश्लेषण केलेले जाईल. सभासद हा संस्थांचा आत्मा असल्याने सभासदांचे जमीन धारणेनुसार वर्गीकरण करुन त्यांच्याकडून प्रश्नावलीद्वारे माहिती भरुन घेतली जाणार आहे.

ब) दुय्यम स्त्रोत :-

प्रस्तुत संशोधनात प्राथमिक स्त्रोतांबरोबर दुय्यम स्त्रोतांचाही वापर केलेला आहे. या दुय्यम स्त्रोतांमध्ये लातूर जिल्हयातील निवडक नागरी सहकारी पतसंस्थांचा सन २००६-०७ ते २०१६-१७ या कालावधीतील वार्षिक अहवाल गोळा / लेखापरिक्षण अहवाल गोळा करुन त्यांचे आर्थिक विश्लेषण केलेले आहे. तसेच याबरोबर भारतीय जनगणना अहवाल, भारताच्या तसेच महाराष्ट्राच्या आर्थिक व सामाजिक समालोचन अहवाल, मासिके, संदर्भ ग्रंथ, वर्तमानपत्रे, एम.फील तसेच पी.एच.डी , प्रबंध, वृत्तपत्रीय बातम्याचे संकलन इ. दुय्यम साधनांद्वारे माहिती गोळा केली जाईल.

<u>प्रकरण नियोजन .</u>

प्रकरण पहिले :- प्रस्तावना व संशोधन पध्दती.

प्रस्तुत प्रकरणामध्ये प्रस्तावना,सहक ाराच्या विकासाची संकल्पना, समस्येची मांडणी, व्याप्ती, संकल्पनांचे स्पष्टीकरण, संशोधन अभ्यासाची उद्दीष्टये, गृहीतके, तथ्य संकलनाच्या पध्दती इ. चा समावेश या प्रकरणात करण्यात येईल.

प्रकरण दुसरे :- संशोधन साहित्याचे सिंहावलोकन.

प्रस्तुत विषयाला अनुसरुन संशोधन साहित्याचा आढावा घेण्यात येईल. यामध्ये सहकार विषयाला अनुसरुन व नागरी सहकारी पतसंस्थांच्या दृष्टीकोनातून ज्या विचारवंतांनी, संशोधकांनी

व लेखकांनी जो अभ्यास केलेला आहे. त्या संशोधनात्मक अध्ययनाचा विचारांचा मागोवा प्रस्तुत प्रकरण्यात घेण्यात येईल.

प्रकरण तिसरे :- सहकारी चळवळीचा आढावा.

प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधनाच्या पहिल्या व दुस-या उद्दीष्टयानुरुप नागरी सहकारी पतसंस्थेच्या इतिहासाचा प्रगतीचा अभ्यास केलेला आहे. यामध्ये विकासाची संकल्पना, सहकाराची संकल्पना, सहकाराचे तत्वे, सहकारी पतसंस्थांची रचना, सहकारी पतसंस्थांची उद्दीष्टये व कार्ये (स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळ) भारतातील सहकारी चळवळ ,महाराष्ट्रातील सहकारी चळवळ , लातूर जिल्हयातील नागरी सहकारी पतसंस्थांशी संबंधीत पतपुरवठाचा आढावा घेण्यात येईल.

प्रकरण चौथे :- लातूर जिल्हयातील आर्थिक व सामाजिक पार्श्वभूमी.

प्रस्तुत प्रकरणात लातूर जिल्हयातील आर्थिक व सामाजिक पार्श्वभूमीचा समावेश केला जाईल. यामध्ये लातूर जिल्हयाची भौगोलिक स्थान व क्षेत्रफळ, ऐतिहासिक पार्श्वभूमी, भूपृष्ठ रचना, भूमी उपयोग, हवामान, पीक पध्दती, लोकसंख्या, शिक्षण, आरोग्य, जलसिंचन, वने व पर्यावरण, सहकार, बॅका तसेच वित्त पुरवठा करणा-या प्राथमिक सहकारी संस्था, वाहतूक व दळणवळण, उदयोग,कृषी क्षेत्र इ.चा समावेश करण्यात येईल.

प्रकरण पाचवे :- लातूर जिल्हयातील नागरी सहकारी पतसंस्थांचे आर्थिक विश्लेषण.

प्रस्तुत प्रकरणात लातूर जिल्हयातील नागरी सहकारी पतसंस्थांची संख्या, सभासद,जिंदगी, देणी, व्यवहार, कर्जाची वर्गवारी, अल्प मध्यम व दीर्घमुदतीच्या कर्जाची कारणपरत्वे वर्गवारी तसेच अल्प , मध्यम व दीर्घ मुदत कर्जाची येणेबाकी, थकबाकी ,उत्पन्न व खर्च इ.ची माहिती दिली जाईल

प्रकरण सहावे :- निष्कर्ष व शिफारशी.

प्रस्तुत प्रकरणामध्ये सपूर्ण संशोधन कार्यातून जे निष्कर्ष मिळातील. त्या संदर्भातील माहिती तसेच लातूर जिल्हयातील नागरी सहकारी पतसंस्थांचा चिकित्सक अध्ययनातून आलेल्या समस्या तसेच लाभ धारक सभासदांच्या दृष्टीकोनातील समस्या व नागरी सहकारी पतसंस्थांच्या समस्या सोडविण्यासाठी निष्कर्षानुसार विविध उपाययोजना करण्यात येतील. यासंबंधीची प्रमुख शिफारशी प्रस्तुत प्रकरणात करण्यात येणार आहेत.

संदर्भ सूची :-

१) प्रा. भोसले के.एम., प्रा.डॉ. दामजी बी.एच, " सहकार", एप्रिल २००७, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

२)बिरादार एम.एन , " सहकार",१९९७, मयूर प्रकाशन, उस्मानाबाद.

३)डॉ.बी.डी.इंगळे , " सहकार", २०१४, अरुणा प्रकाशन, लातूर.

४) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणमंडळ पुणे, " सहकार", २०१२.

५) डॉ.माथूर बी.एस, " को-ऑपरेशन इन इंडिया " १९८६, साहित्यभवन, आग्रा.

६)प्रा. बायस, प्रा.फाले, प्रा.येरोडकर, "सहकार व नियोजन" २०११, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ म. रा.पूणे

७)देशपांडे कृ.भा. " सहकारी संस्थांची कार्यपध्दती ",१९५७, पूणे.

८) प्रा. जोशी शी.जी. " सहकार",आक्टोंबर १९८६, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

९) प्रा. तपकीर मुकूंद, " सहकार तत्वे व व्यवहार", १९९९, निराली प्रकाशन, पूणे.

१०) डॉ. तुपे सु.दा. " सहकारांचे सिध्दांत आणि इतिहास", १९९२ ,द्धारका प्रकाशन,पूणे.

११) डॉ.देसाई, डॉ.भालेराव निर्मल " भारतीय अर्थव्यवस्था", २०१२ निराली प्रकाशन, पूणे.

१२)मोरे शशांक " महाराष्ट्र सहकारी कायदा ",१९६०.

१३) मधु नेने " सहकाराची संकल्पना" २०००, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ म. रा.पूणे.

१४)Gupta k.s. The maharashtra Co_op. Societies Act १९६०.

१५) श्री अंकुश रा. जाधव , "पतसंस्था व्यवस्थापन डायरी सन २०१६. "

१६) श्री वाय.एम.पठाण व सौ. खैरुन्निसा पठाण, "महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१", २०१०.